**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. वैविध्यपूर्ण कार्यक्रमांनी आज 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा.
2. केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या 'देश का प्रकृती परीक्षण' अभियानाने केले अभूतपूर्व पाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स.
3. प्रत्येक बसस्थानक आणि आगारांचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण करावे - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश.
4. २३व्या पुणे इंटरनेशनल फिल्म फेस्टिव्हलची नागपूर आवृत्ती उद्यापासून.
5. बुलढाण्यात उद्यापासून 'राजमाता महोत्सव', महिला बचत गटांनी बनवलेल्या उत्पादनांची प्रदर्शन आणि विक्री.

---

**"मराठी भाषा गौरव दिन"**

कविवर्य वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांची जयंती आज "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून साजरी करण्यात येत आहे. यानिमित्तानं राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कुसुमाग्रजांना अभिवादन केलं असून, राज्यातल्या जनतेला मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. नाशिकच्या शिरवाडे वणी इथं "कवितेचे गाव" या उपक्रमाचं उद्घाटन आज मराठी भाषा मंत्री उदय सामंत आणि मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते झालं. याठिकाणी कुसुमाग्रजांचं साहित्य, कविता आणि अन्य थोर साहित्यिकांचं लेखन संग्रहित केलं जाणार आहे. दरम्यान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागात आज विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. 'मराठी भाषा व साहित्य: सद्यःस्थिती आणि आव्हाने' असा विशेष व्याख्यानाचा विषय होता. यात प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे सदस्य श्रीपाद अपराजित यांनी आपले विचार व्यक्त केले. कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठाच्यावतीने देखील ''मराठी भाषा गौरव दिन'' साजरा करण्यात आला. प्रो.म.रा.जोशी यांचे ''मध्ययुगीन कालखंडातील मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती'' या विषयावर विषेष

व्याख्यान संपन्न झाले. मराठी भाषेच्या गौरवार्थ आणि भाषा आणि साहित्याच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या मान्यवरांच्या सन्मानार्थ, आज मुंबईतल्या गेटवे ऑफ इंडिया इथं संध्याकाळी पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात विजेत्यांना मराठी साहित्यासाठीचे प्रतिष्ठेचे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या 'पुस्तक प्रकाशन' उपक्रमांतर्गत विविध ५१ पुस्तकांचं प्रकाशनही यावेळी होणार आहे.

---------------------------------------------

महाकुंभ-पंतप्रधान नरेंद्र मोदी

प्रयागराज इथला महाकुंभ म्हणजे एकतेचा महान यज्ञ असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. महाकुंभमेळयाच्या यशस्वी समारोपाबद्दल सामाजिक माध्यमांवरील संदेशात त्यांनी समाधान व्यक्त केलं. महाकुंभात भाविकांची प्रचंड गर्दी हा केवळ एक विक्रम नाही तर भारतीय संस्कृती आणि वारशाची अनेक शतके भरभराट होत राहण्यासाठी एक मजबूत पाया रचला असल्याचं त्यांनी नमूद केलं. १४० कोटी नागरिकांची श्रद्धा या उत्सवावर केंद्रीत राहिली, समाजाच्या प्रत्येक वर्गातले आणि क्षेत्रातले लोक एकत्र आल्याचा आनंद पंतप्रधानांनी व्यक्त केला. दरम्यान, महाकुंभमेळ्यासाठी १६ हजाराहून अधिक रेल्वे चालवण्यात आल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली.

---------------------------------------------

'देश का प्रकृती परीक्षण'

केंद्र सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या 'देश का प्रकृती परीक्षण' अभियानाने अभूतपूर्व पाच गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मिळवले आहेत, भारतासाठी ही एक ऐतिहासिक उपलब्धी असून समग्र आरोग्य सेवांबद्दल राष्ट्राच्या वचनबद्धतेचे आणि आयुर्वेदाला मिळत असलेल्या जागतिक मान्यतेचे प्रतीक असल्याची माहिती केंद्रीय आयुष राज्यमंत्री  प्रतापराव जाधव यांनी काल पत्रकार परिषदेत दिली.भारतीय पारंपरिक वैद्यक पद्धतीसाठीच्या राष्ट्रीय आयोगाने भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या सहकार्याने 20 फेब्रुवारी 2025 रोजी मुंबई इथ 'देश का प्रकृती परीक्षण' अभियानाच्या पहिल्या टप्प्याच्या यशस्वी पूर्णतेनिमित्त समारोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात या पाच पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. आगामी काळात असे परीक्षण परदेशात देखील प्रसिद्ध होतील असे जाधव म्हणाले -

*आमचा असा अंदाज आहे की हे सगळं ज्यावेळी प्रचार प्रसार होईल तर बाहेरचे देशसुद्धा आपल्या देशाला मागणी करतील की आमच्या देशातल्या नागरिकांच्या सुद्धा तुम्ही प्रकृती परीक्षण करून द्या. भविष्यामध्ये त्यांच्याकडून असेल तर आपले यावर रिसर्च झाली आपल्याच लोकांनी त्याचा अभ्यास केला, कुणी पीएच.डी. केली, तर ही मागणीसुद्धा भविष्यामध्ये येऊ शकत आणि याच्यामुळं आरोग्य क्षेत्राच्या प्रगतीला आयुर्वेदाच्या माध्यमातून एक चांगलं वळण त्या ठिकाणी मिळेल.*

सर्वाधिक प्रतिज्ञा; डिजिटल प्रमाणपत्र दाखवत असलेल्या लोकांचा सर्वात मोठा ऑनलाइन फोटो अल्बम आणि सर्वात मोठा ऑनलाइन व्हिडिओ अल्बम, अश्या विवीध मानकांवर हे अभियान यशस्वी ठरले आहे. राष्ट्रीय आयुर्वेद दिनाच्या निमित्ताने या अभियानाच्या प्रारंभाची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती. या पहिल्या टप्प्यात 1.29 कोटीहून अधिक नागरिकांचे प्रकृती परीक्षण करण्यात आले. या उल्लेखनीय यशात 1 लाख 81 हजार 667 स्वयंसेवकांनी योगदान दिले, ज्यामध्ये 1 लाख 33 हजार 758 आयुर्वेद विद्यार्थी, 16 हजार 155 शिक्षक आणि 31 हजार 754 वैद्यकीय व्यावसायिकांचा समावेश होता. या बद्दलच्या ॲप विषयी देखील त्यांनी माहिती दिली.

*परीक्षण करने के बाद में हमने एक ऍप उनके मोबाइल में डाउनलोड किया है जो हमने हमारे आयुष विभाग ने डेव्हलप किया था और उसके माध्यम से हर दो महीने में जो ऋतु चेंज होते हैं तो उसके हिसाब से उनको मैसेज दिया जाता है। कि उनकी दिनचर्या कैसी होनी चाहिए। खान पान कैसा होना चाहिए, कौन सी कौन सी खाने में चीजों का परहेज करना चाहिए। ऐसे मैसेज जाते हैं और लोगों को स्वस्थ रखने का काम आयुष विभाग के माध्यम से होता है।*

---

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

राज्यातील सर्वच बसस्थानक आणि आगारांचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण (Security Audit) करण्यात यावे.तसेच बसस्थानक व आगारांमध्ये उभ्या ठेवण्यात येत असलेल्या निर्लेखन बसेस व परिवहन कार्यालयांकडून कारवाईमध्ये जप्त केलेल्या वाहनांचे १५ एप्रिलपर्यंत निष्कासन करण्याचे निर्देश आज परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. महिला प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता बसस्थानकावर असलेल्या सुरक्षा रक्षकांमध्ये महिला सुरक्षा रक्षकांची संख्या वाढविण्याच्या सूचनाही मंत्री सरनाईक यांनी दिल्या.

बसस्थानकांमध्ये महिला प्रवाशांच्या सुरक्षा विषयक आढावा बैठक अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या दालनात घेण्यात आली. दरम्यान, पुण्यात एसटी स्थानकात झालेल्या बलात्काराची जबाबदारी राज्य सरकारची आहे. महाविकास आघाडी सरकारने शक्ती कायदा आणला होता, पण या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. बलात्कार होऊन देखील अजूनही आरोपी पकडला जात नाही यामुळे राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचे धिंदवडे निघाले आहेत अशी टीका काँग्रेस विधी मंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी टीका केली.

------------------------------------------

२३वा पुणे इंटरनेशनल फिल्म फेस्टिव्हल

महाराष्ट्र शासन; महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, सांस्कृतिक कार्य विभाग , पुणे फिल्म फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि मेराकी परफॉर्मिंग आर्टस् ऑर्गनायझेशनच्या सहकार्याने आयोजित "नागपूर एडिशन - २३वा पुणे इंटरनेशनल फिल्म फेस्टिव्हल" चे उद्या २८ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी ५ वाजता बारा राष्ट्रीय पुरस्कार विजेते, पद्म भूषण जाहनू बरुआ यांच्या हस्ते उद्घाटन होत आहे. प्रख्यात दिग्दर्शक व 'पिफ' चे संचालक डॉ. जब्बार पटेल यांच्या मार्गदर्शनात हा फिल्म फेस्टिव्हल नागपूरमधील मेडिकल चौक येथील व्हीआर मॉल, सिनेपोलिसमध्ये होत असून याप्रसंगी 'पिफ' चे क्रिएटिव्ह हेड व फिल्मगुरु समर नखाते, डेप्युटी डायरेक्टर अदिती अक्कलकोटकर यांची प्रमुख उपस्थिती राहील. उद्घाटनानंतर पोलंड येथील डॅमियन कोकर दिग्दर्शित "अंडर द वॉल्कनो" हा १२० मिनिटांचा सिनेमा दाखवण्यात येणार आहे.

------------------------------------------

मानव वन्यजीव संघर्ष

जंगली प्राण्यांमुळे मानव आणि पाळीव प्राणी यांना धोका निर्माण होतो तर मानव वन्यजीव संघर्षामुळे वन्यजीवांना देखील धोका निर्माण होतो. अश्यात मानव वन्यजीव संघर्ष टाळता यावा या उद्देशाने वन विभागाच्या नागपूर जिल्हा अंतर्गत येणाऱ्या पेंच व्याघ्रप्रकल्प अंतर्गत गावा शेजारील जंगलात वर्चुअल वॉल असलेले कॅमेरे लावण्यात आलेले आहेत. या बद्दल अधिक माहिती दिली आहे पेंच नागपूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे....

*व्हर्चुअल वॉल मध्ये सेन्सर लागला आणि सोबतचं फ्लॅशर आहे. खालच्या साईडला एक पेटी त्यामध्ये बॅटरीस आणि इन्व्हर्टर आहे ते 24/7 काम करते*

*आणि इलेक्ट्रिसिटी जनरेट ती सोलर वर करते. यामध्ये सेन्सरमध्ये टायगर, लेपर्थ आणि स्लॉथ बिअर हे तीन प्राणी ते आयडेंटिफाइ करते आणि त्याची रेंज 800 ते 900 मीटर पर्यंतची हिची रेंज आहे तास जंगलामधून त्या तीन प्राण्यांपैकी कुठलंही प्राणी इथून क्रॉस केला त्यामध्ये लगेच ते सेन्सर मध्ये डिटेक्ट करून त्यामध्ये ज्या लोकांना आपण लॉगिन केलेला आहे त्यातून त्यांना तुरंत मॅसेज जाते.*

**सोलर पॅनेल वर हे वर्चुअल वॉल असलेले कॅमेरे काम करतात. लाईटची सोय असल्यामुळे रात्रीच्या वेळेला देखील हा कॅमेरा काम करतो. बॅटरी असल्यामुळे आणि सोलरवर चार्जिंग होत असल्याने 24 बाय 7 हा कॅमेरा काम करतो.**

--------------------------------------------

**'राजमाता महोत्सव'**

**बुलढाणा जिल्हयाच्या ग्रामीण भागातील महिला बचत गटांनी बनवलेल्या उत्कृष्ट व दर्जेदार उत्पादनांच्या प्रदर्शन व विक्रीसाठी बुलढाण्यात उद्या शुक्रवार २८ फेब्रुवारीपासून राजमाता महोत्सवाला सुरुवात होणार आहे. जिल्हयातील उमेद या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत शहरातील जिजामाता प्रेक्षागार क्रीडा व व्यापारी संकुल येथे २८ फेब्रुवारी ते ४ मार्चपर्यंत विभागीय, जिल्हा व मिनी सरस अंतर्गत हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात १५० स्टॉल्सचे भव्य प्रदर्शन व त्याद्वारे उत्पादनांची विक्री केली जाणार आहे. जिल्हा परिषद प्रशासनाच्या नियोजनानुसार या राजमाता महोत्सवाचे उद्घाटन पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या हस्ते होणार असून, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची उपस्थिती असणार आहे.**

--------------------------------------------

**रणजी करंडक**

**रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या अंतीम सामन्याच्या दुसऱ्या दिवशी विदर्भ संघाचा पहिला डाव ३७९ धावांवर आटोपला. केरळच्या संघानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. फलंदाजीसाठी उतरलेल्या विदर्भ संघाची सुरुवात अडखळत झाली. मात्र दानिश मालेवार यानं झुंजार शतकी खेळी करत संघाचा डाव सावरला.**

******